रास्तभाव / शिधावाटप दुकाने
उघडी ठेवण्याच्या वेळाबाबत

**महाराष्ट्र शासन**
**अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक :साविव्य-२००२/३८४/प्र.क्र.९००/नापु २८**
**मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक :- २१ फेब्रुवारी, २००२**

**: शासन परिपत्रक :**

शासन निर्णय अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग क्रमांक :साविव्य-१०९१/२४२४/ प्र.क्र.६१७८/नापु २८, दिनांक :- १२ नोव्हेंबर,१९९१ च्या परिच्छेद १२ मध्ये रास्त भाव/ शिधावाटप दुकाने शासनाने ठरवून दिलेल्या वेळेवर चालू ठेवण्याबाबत आदेश दिले आहेत. तरीही काही ठिकाणी रास्तभाव दुकाने उघडी रहात नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. सबब, कार्डधारकांच्या सोयीसाठी रास्तभाव / शिधावाटप दुकाने उघडी ठेवण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

[अ] स्थानिक परिस्थितीनुसार तसेच कार्डधारकांच्या सोयी विचारात घेऊन प्रत्येक रास्त भाव / शिधावाटप दुकाने सकाळी ४ तास व दुपारी ४ तास निश्चितपणे उघडे ठेवण्यात यावीत. स्थानिक परिस्थितीनुसार याबाबतच्या नेमक्या वेळा अपर जिल्हाधिका-यांनी / नियंत्रक शिधावाटप, मुंबई यांनी निश्चित कराव्यात व तसे सर्व रास्तभाव/ शिधावाटप दुकानदारांना कळविण्यात यावे.

[ब] त्याचप्रमाणे ज्या ठिकाणी आठवडी बाजार भरत असेल अशा ठिकाणी आठवडी बाजाराच्या दिवशी रास्त भाव दुकाने पूर्णवेळ उघडी ठेवण्यात यावीत.

[क] तसेच, विविध कारखाने / उद्योगधंदे असलेल्या क्षेत्रात त्यांच्या साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी रास्त भाव दुकाने पूर्णवेळ उघडी ठेवण्यात यावीत.

२. सर्व अपर जिल्हाधिकारी तसेच नियंत्रक शिधावाटप, मुबई यांनी याप्रमाणे सत्वर कार्यवाही करावी. दुकाने उघडी ठेवण्याच्या वरील [अ],[ब] व [क] प्रमाणे निश्चित केलेल्या वेळांबाबत सर्व रास्तभाव/ शिधावाटप दुकानदारांना कळविण्यात यावे व त्यानुसार दुकाने उघडी ठेवली जातात की नाही यावर लक्ष ठेवण्याच्या सूचना आपल्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रिय अधिकारी/ कर्मचारी याना द्याव्यात. याबाबत कुचराई करणाऱ्या रास्तभाव / शिधावाटप दुकानदारांविरूद्ध दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

२१.२.२००२
( पां.जो. जाधव )
कार्यासन अधिकारी,
अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.

दि. ११/ मार्च/२००२

बारनिशी लिपिक
जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी
पुरवठा विभाग
दिनांक- २८।२।२००२
राधादु
महा. जि. पु. अ.

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त/ सर्व पुरवठा उप आयुक्त

D:\JADHAVCr-900 8